
ePaper

जिथून कसाब आला तोच भाग...सागरी सुरक्षेचं धक्कादायक वास्तव समोर!

वर्ष - 8 । अंक - 266 UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज TM

**आतील पानांत**


- जोश जितेशचा, विजय आरसीबीचा!
- बंगळुरूत कोहलीचं 'विराट' वादळ!
- पहलगाम हल्ल्यामागे भाजपाचा हात!
- काश्मिर विमान प्रवासाच्या दरात घट


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 25एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकिस्तानी नागरिकांना 48 तासांच्या आत देश सोडण्याचा आदेश

# पुण्यामध्ये 111 पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास

## भारतात व्हिसावर आलेल्या नागरिकांमध्ये मुस्लिम, सिंधी आणि हिंदू समाजाच्या व्यक्तींचा समावेश

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**व्हिसावर भारतामध्ये आलेल्या १११ पाकिस्तानी नागरिकांचे सध्या पुण्यामध्ये वास्तव्य आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने घेतलेल्या कठोर निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील या नागरिकांची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारतात व्हिसावर आलेल्या या नागरिकांमध्ये मुस्लिम, सिंधी आणि हिंदू समाजाच्या व्यक्तींचा समावेश आहे.**



> "पाकिस्तानी नागरिकांनी ४८ तासांत देश सोडून जावे, असा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. मात्र, अद्याप स्थानिक पोलिसांना त्या अनुषंगाने कोणताही आदेश प्राप्त झालेला नाही. आदेश प्राप्त होताच त्यानुसार तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ निरपराध भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर देशभरामध्ये संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत भारतामध्ये वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडण्याचा आदेश दिला आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या एकूण १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास आहेत. ५६ महिला आणि ३५ पुरुष दीर्घकालीन व्हिसावर भारतात आले आहेत, अशी माहिती विशेष पोलीस शाखेकडून देण्यात आली. विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते म्हणाले, 'केंद्र सरकारच्या आदेशानंतर शहरातील सर्व पाकिस्तानी नागरिकांची माहिती संकलित करण्यात येत असून, त्यांच्याकडे असलेल्या व्हिसा आणि इतर कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे.

केंद्र सरकारच्या घोषणेनंतर आतापर्यंत तीन पाकिस्तानी नागरिकांनी पुणे पोलिसांच्या परकीय नागरिक नोंदणी कार्यालयाकडून (एफआरओ) 'एक्झिट' प्रमाणपत्र घेतले असून, लवकरच ते भारत सोडून जाणार आहेत. उर्वरित नागरिकांच्याही परतीच्या प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे.' दरम्यान, कोणत्याही अनुचित प्रकाराला आळा बसावा आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, परकीय नागरिकांशी संबंधित सर्व घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

## ७०० नक्षलवाद्यांना दहा हजार पोलिसांनी घेरले!

### 7 नक्षल ठार; पत्रक काढणे नक्षलवाद्यांच्या अंगलट; चकमक सुरूच

। गडचिरोली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्याच्या सिरोंचा तालुक्यातील पातागुडम सीमेपासून ४० किलोमीटर छत्तीसगड तेलंगणाच्या सीमेवरील जंगलात गेल्या ३६ तासांपासून सुरू असलेल्या मोठ्या चकमकीत ७ पेक्षा अधिक नक्षलवादी ठार झाल्याची प्राथमिक माहिती आहे.**



छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्याच्या करेगुट्टा जंगल भागात मोठी नक्षलविरोधी कारवाई सुरु आहे. देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या नक्षलविरोधी कारवाई मानली जात आहे. यात छत्तीसगड, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील १० हजार सुरक्षा जवानांचा सहभाग आहे. त्यांनी बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा जंगल भागात सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरले असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी तेलंगाना राज्यातील नक्षलवाद्यांनी काढलेल्या पत्रकात करेगुट्टा टेकडी परिसरात स्फोटके पुरून ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे या परिसरात नागरिकांनी येऊ नये, असे आवाहन केले होते.मोस्ट वॉन्टेड कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा यांच्यासह प्रमुख नक्षलवादी नेत्यांच्या हालचालीबद्दल गुप्त माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली.

नक्षलवाद्यांच्या पलायनाचे सर्व मार्ग बंद करण्यासाठी सुरक्षा दलांनी संवेदनशील छत्तीसगड-तेलंगणा सीमेवरील करेंगुट्टा भागाला घेरले आहे. घनदाट जंगल आणि टेकड्यांनी वेढलेला हा परिसर नक्षलवादांच्या बटालियन क्रमांक १ चा अड्डा मानला जातो. काही दिवसांपूर्वी नक्षलवाद्यांनी एक प्रसिद्धी पत्रक जारी केले होते. त्यातून त्यांनी ग्रामस्थांना डोंगरात प्रवेश न करण्याचा इशारा दिला होता. या भागात मोठ्या प्रमाणात आयईडी पेरण्यात आले असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते.३१ मार्च २०२६ पूर्वी देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवू, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिला होता. ही घटना अशावेळी घडली आहे.

### कुख्यात नक्षल कमांडर हिडमा जाळ्यात

काही दिवसांपूर्वी तेलंगाना चळवळीतील नेत्यांनी प्रसिद्धी पत्रक काढून छत्तीसगड तेलंगणा सीमेवरील करेगुट्टाटेकडी जवळ ग्रामवासीयांनी टेकडीजवळ येऊ नये अशा प्रकारची चेतावणी दिली होती. यात त्यांनी टेकडीच्या आसपास स्फोटके पेरून ठेवल्याचाही उल्लेख केला होता. त्यानंतर छत्तीसगड सुरक्षा दलाने या परिसरात विशेष अभियान रबविले. गेल्या ३६ पेक्षा अधिक तसांपासून तब्बल आठ ते दहा हजार जवानांनी सातशे ते आठशे नक्षलवाद्यांना घेरले असून त्या ठिकाणी अद्याप चकमक सुरू आहे. यात कुख्यात नक्षल कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा यांच्यासह प्रमुख नक्षलवादी नेते असल्याची शक्यता पोलीस विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

# तलावांचे अतिक्रमणांपासून संरक्षण!

## समाविष्ट गावांबाबत अतिरिक्त आयुक्तांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील बंधारे तसेच पाझर तलावांवर अतिक्रमणे वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा आणि पर्यावरण विभागाकडे या जलस्रोतांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी ही माहिती दिली. महापालिकेच्या हद्दीत समावेश करण्यात आलेल्या ३२ गावांतील बंधारे, पाझर तलाव या नैसर्गिक स्रोतांवर अतिक्रमण होत आहे. या नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन केले जावे, असे पत्र जिल्हा परिषदेने महापालिकेला दिले होते. याची दखल महापालिकेने घेतली आहे. पावसाळ्यापूर्वीची कामे करण्यासाठी महापालिकेच्या वतीने नुकतीच बैठक घेण्यात आली. त्यामध्ये सामाविष्ट गावांतील बंधारे आणि पाझर तलावांच्या संरक्षणाची आणि संवर्धनाची जबाबदारी या विभागांकडे देण्यात आली.महापालिकेत समावेश झालेल्या गावांना आवश्यक सोयी पुरविण्याची जबाबदारी महापालिकेची असल्याने त्या देण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या वतीने केल्या जाणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणासाठी पाषाण, मॉडेल कॉलनी आणि कात्रज येथील तलावांचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या तलावांच्या कामाच्या खर्चाला पालिकेच्या स्थायी समितीने



नुकतीच मान्यता दिली आहे. त्यानुसार तीनपैकी दोन तलावांची कामे सुरू करण्यात आली आहेत. तसेच, महापालिकेत समाविष्ट गावांतील २५ ते ३० पाझर तलाव, तसेच बंधारेदेखील सुरक्षित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

समाविष्ट गावांतील बंधारे, ओढे, नाले तसेच तलावांच्या जागांवर अतिक्रमणे करण्यास सुरुवात झाली आहे. सरकारी जमिनीवर अथवा नैसर्गिक प्रवाह बंद करून तलावांच्या जागांवर अतिक्रमण झाल्यास पुन्हा या जागा ताब्यात घेणे अवघड होते. समाविष्ट गावांतील तलावांबाबत हे होऊ नये, यासाठी पालिकेकडून पुढाकार घेण्यात आला आहे. त्यासाठी तलावांची हद्द ठरविण्यात येणार असून, या जागा महापालिका ताब्यात घेणार आहे. तलावांची जागा ताब्यात आल्यानंतर हे नैसर्गिक प्रवाह जिवंत ठेवण्यास मदत होणार आहे. तसेच, या जागा अतिक्रमणमुक्त राखण्यास मदत होणार आहे, असे पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांतील पाझर तलाव, बंधारे यांचे क्षेत्र महापालिकेने ताब्यात घ्यावे. तेथील अतिक्रमण दूर करावे, असे पत्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी महापालिकेला दिले आहे. याची जबाबदारी पाणीपुरवठा आणि पर्यावरण विभागाकडे देण्यात आली आहे.महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी ही माहिती दिली. महापालिकेच्या हद्दीत समावेश करण्यात आलेल्या ३२ गावांतील बंधारे, पाझर तलाव या नैसर्गिक स्रोतांवर अतिक्रमण होत आहे.

### तलावांचे सुशोभीकरचा निर्णय

या नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन केले जावे,याची दखल महापालिकेने घेतली आहे. पावसाळ्यापूर्वीची कामे करण्यासाठी महापालिकेच्या वतीने नुकतीच बैठक घेण्यात आली. त्यामध्ये सामाविष्ट गावांतील बंधारे आणि पाझर तलावांच्या संरक्षणाची आणि संवर्धनाची जबाबदारी या विभागांकडे देण्यात आली. महापालिकेत समावेश झालेल्या गावांना आवश्यक सोयी पुरविण्याची जबाबदारी महापालिकेची असल्याने त्या देण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या वतीने केल्या जाणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणासाठी पाषाण, मॉडेल कॉलनी आणि कात्रज येथील तलावांचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

# खासगी बालवाड्यांची नोंदणी बंधनकारक

## शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय प्रसिद्ध केला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार आता पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश पायाभूत स्तर म्हणून शालेय शिक्षणात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील खासगी बालवाड्यांची माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध नसल्याने खासगी बालवाड्यांना नोंदणी बंधनकारक करण्यात आली असून, त्यासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.**



शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०मध्ये शिक्षणाचा ५+३+३+४ असा आकृतीबंध करण्यात आला आहे. त्यातील पहिल्या पाच वर्षांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन वर्षे (वयोगट ३ ते ६), तसेच इयत्ता पहिली आणि दुसरी (वयोगट ६ ते ८) यांचा समावेश आहे. हा पाच वर्षांचा टप्पा शिक्षणाचा पायाभूत स्तर मानण्यात आला आहे. त्यानुसार पायाभूत स्तरासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अभ्यासक्रम आराखडाही तयार केला आहे.राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार वय वर्ष तीन ते आठ या वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत, सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि वैकल्पिकदृष्ट्या सुयोग्य वातावरण मिळवून देणारे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सहज उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाड्या, बालवाड्या, शाळेला जोडून पूर्व प्राथमिक वर्ग आणि खाजगी पूर्व प्राथमिक वर्गाद्वारे शिक्षण दिले जाते. त्यापैकी शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बालवाड्या, अंगणवाड्या यांची नोंदणी, माहिती महिला व बाल विकास विभागाकडे उपलब्ध आहे. तर खाजगी बालवाड्यांची माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध नाही. त्यामुळे खासगी बालवाड्यांची माहिती एकत्रित स्वरुपात राज्य, जिल्हा स्तरावर आणि पालकांनाही उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे वय वर्षे तीन ते सहा या गटातील बालकांना शिक्षण देणाऱ्या प्री स्कूल, नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनियर केजी, पूर्व प्राथमिक वर्ग अशा कोणत्याही नावाने सुरू असलेल्या खासगी केंद्रांची नोंदणी करणे बंधनकारक असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.खासगी बालवाड्यांची नोंदणी करण्यासाठी राज्य सरकारने संकेतस्थळ विकसित केले आहे. education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर खासगी बालवाडी नोंदणीची सुविधा देण्यात आली असून, खासगी बालवाड्यांना व्यवस्थापनाची माहिती, विद्यार्थी संख्या, भौतिक सुविधा, कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या बाबतची माहिती ऑनलाइन नोंदणीमध्ये द्यावी लागणार आहे. या नोंदणी बाबतचा अहवाल प्राथमिक शिक्षण संचालकांनी सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०मध्ये शिक्षणाचा ५+३+३+४ असा आकृतीबंध करण्यात आला आहे. त्यातील पहिल्या पाच वर्षांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन वर्षे तसेच इयत्ता पहिली आणि दुसरी यांचा समावेश आहे. हा पाच वर्षांचा टप्पा शिक्षणाचा पायाभूत स्तर मानण्यात आला आहे. त्यानुसार पायाभूत स्तरासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अभ्यासक्रम आराखडाही तयार केला आहे.

### शिक्षण सहज उपलब्ध करून देणे अपेक्षित

प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सहज उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाड्या, बालवाड्या, शाळेला जोडून पूर्व प्राथमिक वर्ग आणि खाजगी पूर्व प्राथमिक वर्गाद्वारे शिक्षण दिले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बालवाड्या, अंगणवाड्या यांची नोंदणी, माहिती महिला व बाल विकास विभागाकडे उपलब्ध आहे.

## चिखली, कुदळवाडीतील 31 धार्मिकस्थळांचा समावेश

# अनधिकृत धार्मिकस्थळांना नोटीसा!

## पंधरा दिवसांत अतिक्रमण काढून टाकण्याची महापालिकेची नोटीस

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेने कुदळवाडी येथील अनधिकृत भंगार व्यवसायिकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली. या कारवाईमध्ये 800 एकरहून अधिक क्षेत्र मोकळे करण्यात आले. यानंतर आता महापालिकेच्या बांधकाम विभागाने 31 अनधिकृत धार्मिक स्थळांना नोटिसा बजाविल्या आहेत. येत्या पंधरा दिवसात ही अनाधिकृत धार्मिक स्थळे स्वतःहून काढून टाकण्यात यावेत अन्यथा महापालिकेमार्फत कारवाई करण्यात येईल असे या नोटिसीमध्ये म्हटले आहे.**





चिखली कुदळवाडी भागामध्ये वारंवार आग लागण्याच्या घटना घडत होत्या. अनधिकृत बेशिस्तपणे वाढलेल्या या अतिक्रमणांमुळे बऱ्याचदा आग लागल्यानंतर अग्निशामक दलाला अडचणी येत असत. चार चार दिवस आग धुमसत राहिल्याचेही अनेकदा दिसून आले. यातून वायू, ध्वनी आणि जलप्रदूषण वाढत असल्याच्या तक्रारी अनेक पर्यावरण प्रेमी तसेच सामाजिक संघटनांच्या होत्या. शिवाय, विकास आराखड्यातील (डीपी) आरक्षणे विकसित करण्याचा मुद्दा पुढे आल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली कुदळवाडी, जाधववाडी भागातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर बुलडोझर फिरवला.

या भोसरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा भाजप नेते महेश लांडगे यांनी देखील चिखली कुदळवाडीतील अनधिकृत भंगार व्यावसायिक, येथील आगीच्या घटना आणि यामुळे होत असलेले परिसराचे प्रदूषण याबद्दल वारंवार मुद्दा उपस्थित केला होता. विधानसभा अधिवेशनात देखील त्यांनी या मुद्द्याकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते. कंपन्या व भंगार मालाच्या

गोदामांमधून सोडल्या जाणाऱ्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे इंद्रायणी नदीचे प्रदूषण वाढत असल्याचा मुद्दा गेल्या काही वर्षात प्रकर्षाने समोर आला. रासायनिक कंपन्या आणि भंगार माल, रद्दी यामुळे वारंवार आग लागण्याच्या घटना घडत होत्या त्यातून वायु प्रदूषण मोठ्या प्रमाणात झाले आहे.

अंतर्गत रस्ते अरुंद असल्यामुळे आगीची घटना घडल्यास घटनास्थळापर्यंत पोहोचण्यास अडचणी येत असल्याचा मुद्दा देखील या अतिक्रमण कारवाई मध्ये अधोरेखित झाला.महापालिका विकास आराखड्यातील रस्ते, उद्या मैदाने, क्रीडांगणाच्या आरक्षणांवर अतिक्रमणे केली गेली होती. सलग आठ महापालिकेने कारवाई करत 827 एकर क्षेत्रावरील अतिक्रमण तोडले. या कारवाईमुळे महानगरपालिकेचे रस्ता आणि आरक्षणांसाठीचे एकूण 100 एकर क्षेत्र अतिक्रमणमुक्त झाले आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अनाधिकृत पत्रा शेड कारवाईनंतर आता चिखली कुदळवाडी यादव नगर येथील अनधिकृत धार्मिक स्थळांना बांधकाम विभागाने नोटीसा बजावल्या आहेत. 31 धार्मिक स्थळे या ठिकाणी अनधिकृत बांधण्यात आल्याचे दिसून आले आहे. पंधरा दिवसात या अनधिकृत धार्मिक स्थळांवर देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे बांधकाम विभागाने दिलेल्या नोटिसांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

---

## दुषित पाणी पुरवठ्यावरुन प्रशासनाची ‘धुलाई’

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी खडसावले; नागरिकांच्या आरोग्याचा विषय गांभीर्याने घ्या!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराला पवना आणि आंद्रा धरणातून पाणी पुरवठा होत आहे. गेल्या आठवडाभरामध्ये शहर आणि उपनगरांमध्ये पिवळसर आणि दुषित पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याचा विषय गांभीर्याने घ्यावा. कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष खपवून घेणार नाही, अशा शब्दांत भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना खडसावले आहे.**



उन्हाची तीव्रता वाढू लागली आहे. त्यामुळे पाणी समस्याही वाढत आहे. शहरातील काही भागांत दुषित पाणी पुवठा होत आहे. याबाबत नागरिकांच्या तक्रारी आहेत. मात्र, प्रशासनाकडून स्वच्छ पाणी पुरवठा होत असल्याचा दावा केला जात होता. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी जलसंपदा विभाग, महापालिका पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आंद्रा पाणी पुरवठा प्रकल्पाच्या निघोजे जॅकवेल येथे तसेच, पवना पाणी पुरवठा प्रकल्पाच्या निगडी जलशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी महापालिका मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे, पाणी पुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता विजयकुमार भोसले, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. कावळे, प्रशांत जगताप, राजेंद्र मोरनकर तसेच संबधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाणी पिंपरी-चिंचवड महापालिका उचलते. त्यासाठी ‘फ्रेश वॉटर’ जलसंपदा विभागातर्फे दिले जाते. गेल्या काही दिवसांत जलसंपदा विभागाचे देहू ते निघोजे दरम्यान तांत्रिक काम सुरू असल्यामुळे धरणामधून होणारा फ्रेश पाण्याचा पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. त्याचबरोबर पिंपरी-चिंचवड हद्दीबाहेरील म्हाळुंगे, देहू, तळेगाव या भागातील रहिवाशी क्षेत्रातील सांडपाणी आणि औद्योगिक पट्ट्यातील रसायनमिश्रीत पाणी नदी पात्रात मिसळत होते. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला पाणी प्रदूषणाची समस्या भेडसावत आहे. याबाबत जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता श्री. गुणाले आणि कार्यकारी अभियंता श्री. दुबल यांना आमदार महेश लांडगे यांनी तात्काळ फोन केला आणि ताबडतोब काम पूर्ण करण्याबाबत सक्त सूचना केली आहे.

### नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब व्हावा...

पवना आणि आंद्रा धरणातून शहराला पाणी पुरवठा केला जातो. शहराचा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा. धरणातून पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे. जलसंपदा विभागाची कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत. नागरिकांना ‘फ्रेश वॉटर’ मिळाले पाहिजे. ज्यामुळे नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. त्यासाठी पाणी प्रक्रियेबाबत नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करता येईल का? यावर प्रशासनाने तज्ज्ञांकडून सल्ला घ्यावा, अशाही सूचना आमदार लांडगे यांनी प्रशासनाला केल्या आहेत.

> पिंपरी-चिंचवड शहराचा पाणी पुरवठा सक्षम आणि स्वच्छ असावा. यासाठी आम्ही आग्रही आहोत. त्यासाठी महापालिका प्रशासन, जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ अशा अस्थापनांनी एकत्रित प्रयत्न करणे अपेक्षीत आहे. त्या अनुशंगाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि प्रस्तावित कामे मार्गी लावण्यासाठी ‘कृती आराखडा’ तयार करावा. पिंपरी-चिंचवडकरांना शुद्ध पाणीपुरवठा करणे, ही प्रशासनासह लोकप्रतिनिधी म्हणून आमची जबाबदारी आहे, त्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.




# पश्चिम बंगालमधील पुरस्कृत हिंसाचार !

**गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत पश्चिम बंगालमधील काँग्रेस, डाव्या आणि तृणमूल काँग्रेस सरकारने पोसलेली बांगला देशी घुसखोरांची व्होट बैंक निवडणुका जवळ आल्याने कामाला लागली असून मुर्शिदाबाद हिंसाचारमागचे ते एक मुख्य कारण आहे. रोहिंग्या आणि बांगला देशी घुसखोरांना हाताशी धरून दंगली घडवल्या जात आहेत.**



**सत्तेवरील तृणमूल काँग्रेस** आणि विरोधी बाकावरील भारतीय जनता पक्ष अशा दोन्ही बाजूंनी निवडणुकीसाठी मैदान तयार केले जात आहे. मतांच्या ध्रुवीकरणासाठी दंगली, धार्मिक हिंसाचारासारख्या समाजविघातक हत्यारांचा केला जाणारा वापर आणखी धोकादायक आहे. बांगला देश पासून पाकिस्तानमधील 'आयएसआय' पर्यंत या हिंसाचाराचे धागेद्वारे पोहोचले असल्याचा होणारा आरोपही तितकाच गंभीर म्हणावा लागेल. मतांसाठी धार्मिक ध्रुवीकरण हा त्यामागील कटाचा मोठा भाग. त्यातही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आपली व्होट बँक एक गठ्ठा ठेवायची आहे. संघीय व्यवस्थेचा उघड भंग करत ममतांनी प्रत्येक मुद्द्यावर केंद्र सरकारला आव्हान दिले आहे. भारतीय जनता पक्षासमोर तेच मोठे आव्हान ठरणार, हे स्पष्ट आहे.करणार नाही. हा कायदा आम्ही बनवलेला नाही. त्यामुळे मी त्याचे समर्थन करणार नाही. ज्यांनी तो बनवला त्यांनाच हिंसाचाराबद्दल विचारा, त्यासाठी तेच जवाबदार आहेत,' असा हल्लाबोल करत ममता बॅनर्जी यांनी वक्फ समर्थकांना कुरवाळले आहे. मुर्शिदाबादसह मुस्लिम बहुल जिल्ह्यांमध्ये हिंसाचाराचा वणवा पसरण्यास त्यांची ही चिथावणी पुरेशी ठरली. मग, या या हिंसाचारात कोणाचे किती जीव गेले, किती नुकसान झाले याचे सोयरसूतक त्यांना नसावे. दुसरीकडे वक्फ सुधारणांचे स्वागत करणाऱ्या अल्पसंख्याक घटकांचा पाठिंबा मिळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. तो यशस्वी होऊ नये, यासाठी ममतांची ही धडपड आहे आणि ती या टोकाला गेली आहे.अल्पसंख्याक वगळून इतर सर्व घटक एकत्र करण्यासाठी भाजपलाही निमित्त हवे होते.

ते आधी वक्फने आणि नंतर खुद्द ममता बॅनर्जी यांनीच दिले आहे. भाजपची मतांची टक्केवारी वाढत आहे आणि त्यात आणखी आठ-दहा टक्क्यांची वाढ झाली आणि काँग्रेस-डाव्या पक्षांनी त्यांची मते टिकवून ठेवली, तर ममतांना धक्का बसू शकतो. ही या घडामोडींमागची पार्श्वभूमी. २९४ जागांच्या विधानसभेत तृणमूल काँग्रेसचे २१५ जागांचे प्रचंड बहुमत आहे, तर भारतीय जनता पक्ष ७७ जागांवर अडखळला आहे. तृणमूल काँग्रेस ४८, तर भारतीय जनता पक्षाकडे ३८ टक्क्यांवर मते आहेत. राज्यातील जनतेने काँग्रेस आणि डाव्या पक्षांना सत्तेबाहेर फेकले होते. त्यांचा एकही आमदार निवडून आला नव्हता. इतिहासातील हे मोठे अपयश या पक्षांच्या पदरी पडले. येत्या निवडणुकीत काँग्रेस आणि डाव्या पक्षांना एक होण्याशिवाय पर्याय नाही; मात्र खरी लढत ममता आणि भाजपमध्येच होणार, हे जवळजवळ स्पष्ट आहे.आगामी निवडणुकीत धार्मिक हिंसाचाराचा ज्वर कोणत्या थराला जाणार, याची ही झलक असून राजकीय पक्षांनी पाच-सहा जिल्ह्यांना अक्षरशः वेठीस घरले आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली असून देशभरातील अन्य राज्यांच्या तुलनेत पोलीस प्रशासन आणि कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती चिंताजनक असल्याचे 'इंडिया जस्टीस रिपोर्ट'मध्ये म्हटले आहे. या ताज्या अहवालाने राज्यातील एकूणच स्थितीवर नेमके बोट ठेवले असून हा अहवाल परिस्थितीजन्य तथ्यावर कसा आधारित आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आजचे जळते वास्तव पुरेसे ठरावे. विशेष म्हणजे, देशाच्या दक्षिणेतील पाचही राज्ये कायदा आणि सुव्यवस्था तसेच न्यायदान प्रक्रियेत आघाडीवर आहेत. कर्नाटकचा क्रमांक वरचा असून पाठोपाठ आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ आणि तामिळनाडू ही राज्ये येतात. महाराष्ट्र याबाबतीत दहाव्या क्रमांकावर आहे, याचीही नोंद राज्यकर्त्यांना घ्यावी लागेल. या धार्मिक ध्रुवीकरणात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेत्यांची फळीच उतरवण्यात आली. योगी यांनी मुर्शिदाबाद मधील हिंसाचाराला मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना जबाबदार धरत थेट आव्हान दिले आहे. भारतीय जनता पक्षाने राज्यात 'योगी मॉडेल' वापरायचे ठरवलेले दिसते.

## प्रासंगिक »

### फसवणूक कशी?

***मेहल चोकसी देश बदलत राहिला, तर भारतीय तपास संस्थांना त्याचा ठावठिकाणा शोधणे कठीण होऊ शकते. त्यामुळे अधिकृत कारवाई अधिक गुंतागुंतीची होऊ शकते.***

भारत सरकारने बेल्जियममधील व्यापारी मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणासाठी अपील केले आहे. बेल्जियमचे नागरिकत्व मिळवून मेहुल चोकसीला युरोपीय देशांमध्ये मुक्तपणे प्रवास करण्याचे स्वातंत्र्य मिळू शकते. हे सगळे गुप्तचर यंत्रणाचे प्रमुख विश्लेषक सांगतायेत. यापूर्वी मेहुल चोकसीने मुंबई न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात भारतात येण्यास असमर्थता व्यक्त केली होती. म्हणून विचारावेसे वाटते मेहुल बोकसीला चौकशीसाठी भारतात आणणार का? पंजाब नॅशनल बँकेत १३ हजार कोटीहून जास्त रकमेच्या पोटाळ्याचे आरोपी मेहुल चोकसी यांना कॅरेबिचन बेटावरील होमिनिका सरकारने ताब्यात घेतलं तेव्हा म्हणजे २०२१ मध्ये मेहुल चोकसी यांना डोमिनिका सरकारने पोटाळा करून पसार झाल्यानंतर जानेवारी २०१८ मध्ये, पंजाब नॅशनल बँकेने खुलासा केला.

**धुनिक जगतात दहशतवाद हा केवळ आसुरक्षेशी संबंधित प्रश्न न राहता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थैर्यासाठीही मोला धोका ठरत आहे. उलट त्याच्या स्वरूपात लक्षणीय बदल झाला आहे. दहशतवादी गट आता पारंपरिक शस्त्रपिक्षा डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर जास्त करत असून त्यामुळे त्यांची कारवाई रोखणे अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. २०२४ मध्ये दहशतवादी घटनांमुळे मृत्युमुखो पडणाऱ्यांची संख्या ११ टक्क्यांनी वाढली.**

# दहशतवाद नव्या रूपात

आहे. दहशतीचा फटका बसलेल्या देशांची संख्या ५८ वरून ६६ झाली आहे. यावरून हे स्पष्ट होते की, हा धोका कमी करण्याचे प्रयत्न पुरेसे नाहीत. सर्वाधिक प्रभावित देशांमध्ये बुर्किना फासो, पाकिस्तान, सीरिया, माली, नायजेरिया, सोमालिया, इस्रायल, अफगाणिस्तान आणि कॅमेरून यांचा समावेश होतो. दहशतवाद आता केवळ संघटित गटांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो सायबर दहशतवादाच्या रूपातही पुढे येत आहे.

पाश्चात्त्य देशांमध्ये गेल्या काही वर्षांत 'लीन वुल्फ' हल्ल्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. असे हल्ले विशेषतः युरोप व अमेरिका या भागांत झाले असून, यामध्ये एखादा व्यक्ती, जो एखाद्या दहशतवादी विचारसरणीने प्रभावित असतो, एकट्यानेच सामूहिक हिंसा किंवा आत्मघातकी हल्ला करतो. सायबर दहशतवाद हे दहशतवादाचे एक नवे रूप आहे. दहशतवादी आता सायबर हल्ल्यांचा वापर केवळ सरकारी यंत्रणांना लक्ष्य करण्यासाठीच



नव्हे, तर खोटा प्रचार करण्यासाठी आणि निधी उभारण्यासाठीही करत आहेत.

क्रिप्टोकरन्सीचा वाढता वापर यामुळे दहशतवादी गटांच्या आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे कठीण झाले आहे. जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ नुसार विशेषतः बुर्किना फासोमध्ये दहशतवादी हालचाली वेगाने भारतात गेल्या दशकभरात काश्मीर वगळता देशाच्या अन्य भागांत एकही मोठा दहशतवादी हल्ला घडून आलेला नाही, हे आपल्या सुरक्षा यंत्रणांचे, पोलिस प्रशासनाचे, गुप्तचर यंत्रणांचे आणि पर्यायाने सरकारचे मोठे यश आहे; पण याचा अर्थ दहशतवाद संपुष्टात आला, असे नाही. दहशतवादी संघटना आता पारंपरिक शस्त्रास्त्रांऐवजी डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिक वापर करत आहेत. त्यामुळे त्यांची कृत्ये नियंत्रणात आणणे अधिक अवघड होत चालले आहे. २०२४ मध्ये दहशतवादी घटनांमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या संख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

वाढत आहेत. आफ्रिकेमध्ये दहशतवादी संघटनांच्या वाढीच्या मागे मुख्यतः राजकीय अस्थिरता, कमकुवत सुरक्षा व्यवस्था आणि सामाजिक विषमता हे घटक कारणीभूत आहेत. अल-कायदा आणि आयएससारख्या संघटनांनी या परिस्थितीचा फायदा घेत प्रभावाचा विस्तार केला आहे. मध्य पूर्वेसाठी हा धोका अधिक गंभीर आहे. २०२४ मध्ये आयसिसने २२ देशांमध्ये १८०५ जणांची हत्या केली असून, विशेषतः सीरिया आणि काँगो येथे त्यांचा प्रभाव मोठा होता. आयसिसनेही (के) आपली क्रियाशीलता वाढवली असून इराण आणि रशियात मोठे हल्ले केले आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हिंदीबरोबर उर्दू भाषाही शिकवा!

## मनसेवर टीका करताना संजय गायकवाड यांची अजब मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर संबंध देशावर शोककळा पसरली आहे. पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांना जशास तसा धडा शिकविला जावा, अशी मागणी होत आहे. तत्पूर्वी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते, आमदार संजय गायकवाड यांनी या दहशतवादी हल्ल्याच्या निमित्ताने वेगळीच मागणी केली आहे.**

मनसेने हिंदी भाषा सक्तीची करण्यास विरोध दर्शविला होता. महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य केल्यास आंदोलन छेडू असा इशारा राज ठाकरे यांनी दिल्यानंतर राज्य सरकारने एक पाऊल मागे जात सुधारित शासन निर्णय काढला होता. आमदार संजय गायकवाड बुलढाणा येथे माध्यमांशी बोलत असताना त्यांना याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी मनसेला टोला लगावताना अजब मागणी केली. संजय गायकवाड म्हणाले, "जे कोणी पक्ष किंवा लोक म्हणतात की, हिंदी शिकवली जाऊ नये. हिंदी राष्ट्रभाषा नाही. पण जर आम्ही युपी-बिहार किंवा दिल्लीमध्ये गेलो आणि तिथे मराठीशिवाय इतर कोणतीच भाषा आली नाही. तर आमच्या लोकांनी तिकडे काय करावे. आज देशात कुठेही गेला तरी हिंदी किंवा इंग्रजी भाषेत संवाद साधला जातो. त्यामुळे हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे."छत्रपती संभाजी महाराजांना १६ भाषा अवगत होत्या. मग तुम्ही त्यांच्या विचारांनाही लाथ मारणार आहात का? शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ हे बहुभाषिक होते. त्यांना अनेक भाषा येत होत्या. त्यांनी भाषा शिकून चूक केली का? आमच्या महाराष्ट्रातील युवक जगात कुठेही गेले तरी त्यांना जगाच्या सगळ्या भाषा आल्या पाहिजेत. एवढेच काय, तर हिंदीबरोबर उर्दू भाषाही पहिल्या वर्गापासून शिकवली गेली पाहिजे", अशी अजब मागणी संजय गायकवाड यांनी केलीया मागणीबाबत बोलताना ते पुढे म्हणाले,"उर्दू भाषेत अतिरेकी संदेश पाठवत असतात. पण आपल्याला उर्दू समजत नसल्यामुळे ते पकडले जात नाहीत. त्यामुळे उर्दूही शिकवली गेली पाहिजे."दरम्यान शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार नरेश म्हस्के यांनीही आज एक अजब विधान केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यातील पर्यटकांना दिलासा देऊन परत आणण्यासाठी श्रीनगरला गेले आहेत. त्यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हस्के म्हणाले की, एकनाथ शिंदेंनी पर्यटकांना दिलासा दिला. त्यांना विमानतळावर आणले. अनेक पर्यटक रेल्वेने, बसने प्रवास करणारे आहेत. त्यांना शिंदेंमुळे पहिल्यांदाच विमानात बसता आले.

मनसेने हिंदी भाषा सक्तीची करण्यास विरोध दर्शविला होता. महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य केल्यास आंदोलन छेडू असा इशारा राज ठाकरे यांनी दिल्यानंतर राज्य सरकारने एक पाऊल मागे जात सुधारित शासन निर्णय काढला होता. आमदार संजय गायकवाड बुलढाणा येथे माध्यमांशी बोलत असताना त्यांना याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी मनसेला टोला लगावताना अजब मागणी केली. संजय गायकवाड म्हणाले, "जे कोणी पक्ष किंवा लोक म्हणतात की, हिंदी शिकवली जाऊ नये. हिंदी राष्ट्रभाषा नाही. पण जर आम्ही युपी-बिहार किंवा दिल्लीमध्ये गेलो आणि तिथे मराठीशिवाय इतर कोणतीच भाषा आली नाही. तर आमच्या लोकांनी तिकडे काय करावे. आज देशात कुठेही गेला तरी हिंदी किंवा इंग्रजी भाषेत संवाद साधला जातो. त्यामुळे हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे."छत्रपती संभाजी महाराजांना १६ भाषा अवगत होत्या. मग तुम्ही त्यांच्या विचारांनाही लाथ मारणार आहात का? शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ हे बहुभाषिक होते. त्यांना अनेक भाषा येत होत्या. त्यांनी भाषा शिकून चूक केली का? आमच्या महाराष्ट्रातील युवक जगात कुठेही गेले तरी त्यांना जगाच्या सगळ्या भाषा आल्या पाहिजेत. एवढेच काय, तर हिंदीबरोबर उर्दू भाषाही पहिल्या वर्गापासून शिकवली गेली पाहिजे", अशी अजब मागणी संजय गायकवाड यांनी केलीया मागणीबाबत बोलताना ते पुढे म्हणाले,"उर्दू भाषेत अतिरेकी संदेश पाठवत असतात. पण आपल्याला उर्दू समजत नसल्यामुळे ते पकडले जात नाहीत. त्यामुळे उर्दूही शिकवली गेली पाहिजे."दरम्यान शिवसेना (शिंदे) पक्षाचे खासदार नरेश म्हस्के यांनीही आज एक अजब विधान केले.



### जशास तसा धडा शिकविला जावा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यातील पर्यटकांना दिलासा देऊन परत आणण्यासाठी श्रीनगरला गेले आहेत. त्यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हस्के म्हणाले की, एकनाथ शिंदेंनी पर्यटकांना दिलासा दिला. त्यांना विमानतळावर आणले. त्यांना शिंदेंमुळे पहिल्यांदाच विमानात बसता आले.पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर संबंध देशावर शोककळा पसरली आहे. पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांना जशास तसा धडा शिकविला जावा, अशी मागणी होत आहे. तत्पूर्वी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते, आमदार संजय गायकवाड यांनी या दहशतवादी हल्ल्याच्या निमित्ताने वेगळीच मागणी केली आहे.

# विलेपार्ले येथील नाल्यालगतची अतिक्रमणे हटवा

## रस्ता पूर्ववत करण्याचे उच्च न्यायालयाचे महापालिकेला आदेश

**। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**विलेपार्ले येथील जुहू पीव्हीआरसमोरील इर्ला नाल्यालगतच्या पश्चिम आणि पूर्व बाजूंना असलेली अतिक्रमणे हटवून सेवा रस्ता पूर्ववत करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने गुरुवारी महानगरपालिकेला दिले.**



जुहू पीव्हीआरसमोरील इर्ला नाल्यालगतच्या पश्चिम आणि पूर्व बाजूंच्या सेवा रस्त्यावर असलेली अतिक्रमणे हटवून सेवा रस्ता पूर्ववत करण्याच्या तसेच नालेसफाईच्या मागणीसाठी जनहित याचिका करण्यात आली होती. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर गुरूवारी सुनावणी झाली. त्यावेळी, नाल्यालगतच्या पश्चिम आणि पूर्व बाजूंना उभी राहिलेली अतिक्रमणे हटवण्याबाबत गेल्या आठ वर्षांपासून महापालिकेकडे पाठपुरावा करत असल्याचे याचिकाकर्त्यांच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. त्यावर, नाल्यालगतच्या पश्चिम बाजूला असलेली अतिक्रमणे हटवण्याचे काम सुरू असून लवकरच ते पूर्ण केले जाईल आणि सेवा रस्ता पूर्ववत करण्यात येईल, असे महापालिकेच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. तथापि, नाल्यालगतच्या पूर्व बाजूला असलेल्या अतिक्रमणांबाबतचा मुद्दाही याचिकेत उपस्थित करण्यात आल्याचे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्याची दखल घेऊन न्यायालयाने महापालिकेकडे त्याबाबत विचारणा केली असता नाल्याच्या पूर्व बाजूच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन (झोपु) योजना राबवण्यात येत असून ती पूर्ण होण्यास वेळ लागणार आहे. त्यामुळे अतिक्रमण करणाऱ्यांचे या योजनेनंतर्गत पुनर्वसन केल्यावर नाल्यालगतच्या पूर्व बाजूचा सेवा रस्ता पूर्ववत केला जाईल, असे महापालिकेच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. महापालिकेच्या या वक्तव्याची मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दखल घेतली. तसेच इर्ला नाल्यालगतच्या पश्चिम व पूर्व बाजूला असलेली अतिक्रमणे हटवून सेवा रस्ता पूर्ववत करण्याचे आदेश न्यायालयाने महापालिकेला दिले.याचिकाकर्ते हे सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांनी यापुढे स्वत:ला सामाजिक कार्यासाठी झोकून द्यावे. त्यांनी जनहित याचिकेद्वारे नालेसफाईची मागणी केली आहे. तथापि, जनहित याचिका करून अशी मागणी करणे सोपे आहे. मात्र, तळागाळाच्या पातळीवर काम करणे सोपे नाही.

### याचिकेद्वारे नालेसफाईची मागणी

न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सुनावले. तसेच, त्याचाच भाग म्हणून त्यांनी नाल्यांच्या साफसफाईचे काम योग्यरीतीने होत आहे की नाही यावर देखरेख ठेवण्याच्या जबाबदारीचे काम सोपवण्याची मागणी महापालिकेकडे करावी, असे न्यायालयाने याचिकाकर्त्यांना मिश्किलपणे म्हटले.

# पहलगाम हल्ल्यामागे भाजपाचा हात!

## आ.इस्लाम यांचे वादग्रस्त विधान; आसाम पोलिसांनी केली अटक



।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे भारतासह संपूर्ण जगभरात हळहळ व्यक्त होत आहे. आसाममधील ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (AIUDF) पक्षाचे नेते आणि ढिंग विधानसभेचे आमदार अमिनूल इस्लाम यांनी मात्र या हल्ल्याबाबत वादग्रस्त विधान केले. या विधानानंतर त्यांच्यावर आसाम पोलिसांच्या गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याची भलामण करणाऱ्यांना सोडले जाणार नाही, अशा इशारा मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी कारवाईनंतर दिला.**

आमदार अमिनूल इस्लाम यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा सरकारचा हात असल्याचे वादग्रस्त विधान केले होते. तसेच २०१९ साली पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यामागेही केंद्र सरकारचा हात होता, असेही ते म्हणाले. पहलगाम येथील हल्ल्यात २६ तर पुलवामा हल्ल्यात ४२ जणांचा जीव गेला होता.अमिनूल इस्लाम म्हणाले की, २०१९ साली पुलवामा हल्ल्यात सीआरपीएफचे ४२ जवान मारले गेले होते. मी तेव्हाच म्हणालो होतो की, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी देशात ध्रुवीकरणाचे वातावरण निर्माण करण्यासाठी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने हा हल्ला घडवून आणला गेला. या हल्ल्याची निष्पक्ष चौकशी केली जावी, अशीही मागणी तेव्हा केली होती."पहलगाम येथील हल्ल्यानंतर भाजपाकडून देशभरात एक नरेटिव्ह पसरवले जात आहे. अतिरेक्यांनी पर्यटकांना मारण्यापूर्वी त्यांचा धर्म विचारला आणि फक्त बिगरमुस्लीमांना गोळ्या घातल्या. मात्र हल्ल्यातून वाचलेल्या लोकांनी याला दुजोरा दिलेला नाही. अतिरेक्यांनी कुणालाही नाव न विचारता काही अंतरावरून गोळ्या झाडल्याची बाब समोर आली आहे", असा दावा आमदार अमिनूल इस्लाम यांनी केला होता.आमदार इस्लाम यांचे विधान सोशल मीडियावर पसरले असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची प्रतिकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशी प्रतिक्रिया पोलिसांनी दिली. त्यानंतर इस्लाम यांच्यावर भारतीय न्याय संहिता कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी आसाम पोलिसांची एक्स पोस्ट शेअर करत त्यावर प्रतिक्रिया दिली. "पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ला झाला.

या हल्ल्याचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या समर्थन करणाऱ्यांवर अशाचप्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल", असा इशारा सरमा यांनी दिला.आमदार अमिनूल इस्लाम यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा सरकारचा हात असल्याचे वादग्रस्त विधान केले होते. तसेच २०१९ साली पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यामागेही केंद्र सरकारचा हात होता, असेही ते म्हणाले. पहलगाम येथील हल्ल्यात २६ तर पुलवामा हल्ल्यात ४२ जणांचा जीव गेला होता.अमिनूल इस्लाम म्हणाले की, २०१९ साली पुलवामा हल्ल्यात सीआरपीएफचे ४२ जवान मारले गेले होते. मी तेव्हाच म्हणालो होतो की, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी देशात ध्रुवीकरणाचे वातावरण निर्माण करण्यासाठी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने हा हल्ला घडवून आणला गेला. या हल्ल्याची निष्पक्ष चौकशी केली जावी, अशीही मागणी तेव्हा केली होती."पहलगाम येथील हल्ल्यानंतर भाजपाकडून देशभरात एक नरेटिव्ह पसरवले जात आहे. अतिरेक्यांनी पर्यटकांना मारण्यापूर्वी त्यांचा धर्म विचारला आणि फक्त बिगरमुस्लीमांना गोळ्या घातल्या. मात्र हल्ल्यातून वाचलेल्या लोकांनी याला दुजोरा दिलेला नाही. अतिरेक्यांनी कुणालाही नाव न विचारता काही अंतरावरून गोळ्या झाडल्याची बाब समोर आली आहे", असा दावा आमदार अमिनूल इस्लाम यांनी केला होता.

### कठोर कारवाई करण्यात येईल

आमदार इस्लाम यांचे विधान सोशल मीडियावर पसरले असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची प्रतिकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशी प्रतिक्रिया पोलिसांनी दिली. त्यानंतर इस्लाम यांच्यावर भारतीय न्याय संहिता कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली.आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी आसाम पोलिसांची एक्स पोस्ट शेअर करत त्यावर प्रतिक्रिया दिली. "पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्याचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या समर्थन करणाऱ्यांवर अशाचप्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल", असा इशारा सरमा यांनी दिला.

# काश्मिर विमान प्रवासाच्या दरात घट

## प्रति व्यक्ती 12 हजारावरुन 4 हजारावर, पर्यटक कंपन्यांचे नुकसान




।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मिर येथील पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर एकाच दिवसात मुंबई ते श्रीनगर या विमानप्रवासाच्या दरात मोठी घट झालेली पाहायला मिळत आहे. एप्रिल ते जून हा कालावधीत जम्मू-काश्मिरला जाण्याचा उत्तम कालावधी मानला जातो. यादिवसात विविध राज्यातून त्यातही, महाराष्ट्रातून सर्वाधिक पर्यटक जम्मू – काश्मिरला जातात. ऐरव्ही मुंबई ते श्रीनगर या विमान प्रवासाचे दर प्रती व्यक्ती १२ हजार ते १५ हजार रुपये इतके असायचे.**

परंतू, या घटनेनंतर एका दिवसात मुंबई ते श्रीनगर विमान प्रवासाचे दर प्रती व्यक्ती ४ हजार झाले आहे. या हल्ल्याचा वैमानिक कंपन्यांसह, पर्यटन कंपन्याना तसेच जम्मू- काश्मिर तसेच श्रीनगर येथील हॉटेल व्यावसायिकांना यांचा फटका बसला आहे.पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप २८ जणांना आपले जीव गमवावे लागले. परंतू, या हल्ल्यानंतर जम्मू – काश्मिरमध्ये भ्याड शांतता पसरली असून याचा परिणाम तेथील पर्यटन व्यवसायावर झाला आहे. एप्रिल ते जून हा कालावधी जम्मू – काश्मिरला जाण्यासाठी योग्य मानला जातो. यादिवसात काश्मिरमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. त्यामुळे विमान प्रवासापासून ते अगदी हॉटेल पर्यंत असे सर्वच दर वाढलेले दिसतात. या कालावधीत पर्यटन कंपन्यांकडून देखील विविध आकर्षित सवलती असलेले जम्मू – काश्मिर या स्थळाचे पॅकेज तयार केले जातात. त्यामुळे याकालावधीत जम्मू – काश्मिरला जाणाऱ्यांची संख्या सर्वाधिक असते. यात, महाराष्ट्रातील नागरिक जास्त असल्याचे मत एका पर्यटक कंपनीने व्यक्त केले.जम्मू – काश्मिर मध्ये श्रीनगर, हाऊस बोट, पहलगाम, गुलमर्ग, सोनमर्ग हे पर्यटनासाठी महत्त्वाची ठिकाण आहेत. पर्यटन कंपनीकडून पाच ते सहा दिवसाचे याठिकाणी फिरण्याचे पॅकेज तयार केले जाते. या पॅकेजमध्ये प्रवास, जेवण, आणि राहण्याचा खर्च समाविष्ट असतो. दर्जेदार हॉटेल मध्ये राहण्याची व्यवस्था पाहिजे असेल तर, प्रति व्यक्ती ६० ते ७० हजार इतका खर्च होतो. तर, सामान्य हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था असेल तर, ३० ते ४० हजार इतका खर्च येतो. तसेच जोडप्यांसाठी दर्जेदार हॉटेलसाठी ८० ते ९० हजार आणि सामान्य हॉटेलसाठी ४० ते ५० हजार इतका खर्च येतो, या पद्धतीने कश्मिर टूर चे पॅकेज तयार केले जाते. याठिकाणी जाण्यासाठी पर्यटक देखील उत्सूक असतात.

### पर्यटक कंपनीचे म्हणणे...

पर्यटकांना परवडेल अशा पद्धतीनेच आम्ही जम्मू-काश्मिर टूर चे पॅकेज तयार केले जाते. परंतू, अनेकदा काही पर्यटक जम्मू-काश्मिरला जाण्यासाठी घाबरतात, पण आम्ही त्यांना विश्वास देतो की, कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. आणि खरंच इतक्या वर्षात पहलगाम सारखा प्रकार कधी घडलेला नव्हता.

# १० लाख रुपयांत पुजाऱ्याने 'असा' बनवला चित्रपट

चित्रपट म्हटलं की कलाकार, दिग्दर्शक, निर्माते, संगीतकार, क्रू मेंबर्स, लोकेशन अशा अनेक गोष्टी गरजेच्या असतात. पण फक्त दोन जणांनी यापैकी कोणत्याच गोष्टींशिवाय फक्त १० लाख रुपये खर्च करून एक चित्रपट तयार केला आहे, असं म्हटलं तर तुम्हाला विश्वास बसेल का? कदाचित नाही. पण हे खरंय. हा चित्रपट आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयचा वापर करून तयार करण्यात आला आहे. बंगळुरूजवळच्या सिद्धेहल्ली गावातील पूजारी नरसिम्हा मूर्ती यांच्यासाठी हा चित्रपट एक स्वप्न होतं. स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी नूतन नावाच्या एआय एक्सपर्टची मदत घेतली. नूतन आधी ग्राफिक डिझायनर होते. ९५ मिनिटांच्या या कन्नड चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाकडून U/A सर्टिफिकेट दिलं आहे.'लव्ह यू' हा चित्रपट फक्त दोन जणांच्या टीमने केला आहे. नरसिम्हा मूर्ती व नूतन अशी त्यांची नावं आहे. त्यांनी एआयच्या मदतीने कलाकार तयार केले, साउंडट्रॅक बनवले व व्हिज्युअल क्रिएट केले. यानंतर त्यांनी ३० वेगवेगळे टूल्स वापरले. या चित्रपटासाठी १० लाख रुपयांचा खर्च आला. त्यापैकी जास्तीत जास्त पैसे एआय सॉफ्टवेअर लायसेन्सिंगवर खर्च केले आहेत.'टाइम्स ऑफ इंडिया'शी बोलताना



नरसिम्हा मूर्ती यांनी सांगितलं की त्यांना जगातील पहिला एआय फीचर चित्रपट बनवायचा होता आणि तो सिनेमागृहांमध्ये रिलीज करायचा होता. एक रेकॉर्ड बनवण्यासाठी हा चित्रपट थिएटरमध्ये रिलीज करायचा आहे, अशी त्यांची इच्छा आहे. ९५ मिनिटांच्या या कन्नड चित्रपटात १२ गाणी आहेत आणि एआयने तयार केलेले संवाद आहेत. पण यासाठी मूर्ती यांनीही मेहनत घेतली आहे.'लव्ह यू' हा जगातला पहिला एआय जनरेटेड चित्रपट नाही. २०२४ मध्ये 'व्हेयर द रोबोट्स ग्रो' नावाचा चित्रपट आला होता, जो पहिला एआय जनरेटेड चित्रपट आहे. नरसिम्हा यांनी सेन्सॉर बोर्डाची प्रतिक्रिया सांगितली. "रिजनल सेन्सॉर ऑफिसर्सनी सीनमधील पात्रांच्या सिंकिंग समस्येकडे लक्ष वेधले होते. कारण या पात्रांवर भावनिक सीन बनवणं तसेच लिप-सिंकिंग करणंही आव्हानात्मक होतं. पण सेन्सॉर बोर्डाने आमची महत्वाकांक्षा व इनोव्हेशनचं कौतुक केलं," असं नरसिम्हा म्हणाले.

## त्यामुळे तिने मला सोडले

बॉलीवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत, ज्यांच्या नात्याबद्दल आजही बोलले जाते. त्यापैकी एक जोडी आहे ती कबीर बेदी व परवीन बाबी यांची. त्यांच्या नात्याविषयी आजही अनेकदा चर्चा होताना दिसते. कबीर बेदी यांनी परवीन बाबी यांच्याबरोबर असलेल्या नात्यातून माघार घेतली, असे म्हटले जाते. मात्र, एका मुलाखतीत कबीर बेदी यांनी यावर खुलासा केला होता.१९८० मध्ये कबीर बेदी व परवीन बाबी यांच्या नात्याने चांगलेच लक्ष वेधून घेतले होते. कबीर बेदी यांचे लग्न झाल्यानंतर ते परवीन बाबी यांच्या प्रेमात पडले. त्याचदरम्यान, परवीन बाबी यांचे अभिनेता डॅनी डेन्झोंगपा यांच्याबरोबर ब्रेकअप झाले होते. कबीर बेदी यांनी त्यांच्या आत्मचरित्रातदेखील परवीन बाबी यांच्याबरोबरच्या नात्याबद्दल लिहिले होते. 'स्टोरीज आय मस्ट टेल : द इमोशनल लाइफ ऑफ ॲन ॲक्टर' या त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी लिहिलेय की, आम्ही आमच्या आयुष्यात कठीण काळातून जात असताना एकमेकांच्या प्रेमात पडलो.

## दियाचा प्रोजेक्ट काय ?



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे. दिया मिर्झाची 'पन्हं' या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. "हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..'पन्हं'", असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. "या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे," असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील 'पन्हं' या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. "एका दमदार टीमबरोबर नवीन काम", असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.दरम्यान, दिया मिर्झाची ही शॉर्ट फिल्म काय आहे?

## "किती खालच्या थराला गेलो आपण?

गेल्या दोन दिवसांपासून जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दलचे अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या व्हायरल व्हिडीओमध्ये एक नवविवाहित जोडपं काश्मीरच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये आनंद घेत असतानाचे दिसत आहे. हा व्हिडीओ विनय नरवाल आणि त्यांची पत्नी हिमांशी यांचा असल्याचा दावा करण्यात येत आहे. पण हा व्हिडीओ त्यांचा नसून सोशल मीडिया इन्फ्लुएंसर यशिका शर्मा आणि आशिष सहरावत यांचा आहे. याबद्दल स्वतः यशिका आणि आशिष यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे व्हिडीओ शेअर करत माहिती दिली आहे. यात त्यांनी असं म्हटलं आहे की, "आम्ही जीवंत आहोत, कारण आम्ही त्या हल्ल्यात नव्हतो. पण आमचा व्हिडीओ हल्ल्यात मृत्यू झालेल्या नेव्ही ऑफिसरचा असल्याचा दावा करून कसा व्हायरल केला जात आहे हे आम्हाला माहित नाही. सर्वत्र मीडिया चॅनेलवर आमचं फुटेज दाखवून ते त्या दुःखद घटनेशी जोडलं जात आहे."यशिका आणि आशिष यांच्या या व्हिडीओवर प्रसिद्ध मराठी गायकने मंगेश बोरगावरने भाष्य केलं आहे. गायकाने त्या दोघांचा व्हिडीओ स्वत:च्या स्टोरीवर शेअर केला आहे आणि योग्य ती शहानिशा न करता व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांबद्दल संताप व्यक्त केला आहे. यावर मंगेशने असं म्हटलं आहे की, "सबसे तेज म्हणवून घेण्याच्या नादात काय दाखवतील विश्वास नाही. गेल्या दोन दिवसांत समाज म्हणून किती खालच्या थराला गेलोय आपण? डिजिटल मीडियाने तर कळस गाठला आहे. संपूर्ण खात्री करुनच व्यक्त होऊयात.



## 'अबीर गुलाल' भारतात प्रदर्शित होणार नाही

म्मू-काश्मीरमध्ये पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानी अभिनेता फवाद खानच्या आगामी 'अबीर गुलाल' चित्रपटाला खूप विरोध होत आहे. सोशल मीडियावर लोक या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली जात आहे. आता सरकारने या चित्रपटाबद्दल मोठा निर्णय घेतला आहे. हा चित्रपट आता भारतात प्रदर्शित होणार नाही. फवाद खान व वाणी कपूर (VAANI KAPOOR) यांच्या चित्रपटाचं नाव 'अबीर गुलाल' आहे. हा चित्रपट भारतात प्रदर्शित होणार अशी चर्चा होती, मात्र आता तसं होणार नाही. हा चित्रपट ९ मे रोजी रिलीज होणार आहे.माहिती आणि प्रसारण मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी अभिनेता फवाद खानचा 'अबीर गुलाल' हा चित्रपट भारतात प्रदर्शित होऊ दिला जाणार नाही. अनेक चित्रपटगृहे फवादचा हा चित्रपट प्रदर्शित करण्यास तयार नव्हती आणि अनेक मनोरंजन संस्थांनी त्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी केली होती. आता मंत्रालयानेही त्याच्या प्रदर्शनाला परवानगी देण्यास नकार दिला आहे.फवाद खानने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करून पहलगाम हल्ल्याबद्दल दुःख व्यक्त केलं. "पहलगाममधील भीषण हल्ल्याच्या बातमीने दुःख झालंय. आमच्या संवेदना आणि प्रार्थना या भीषण घटनेतील पीडितांच्या पाठीशी आहेत. या कठीण काळात त्यांच्या कुटुंबासाठी हिंमत मिळावी, त्यांना सावरायचं बळ मिळो यासाठी आम्ही प्रार्थना करतो," असं फवाद खानने लिहिलं.फवाद खानच्या 'अबीर गुलाल' चित्रपटाला मनसेने विरोध केला होता. "पाकिस्तानी कलाकारांचे चित्रपट भारतात प्रदर्शित होऊ देणार नाही, हे इतक्या वेळा सांगूनही काही नासके आंबे उपटतातच.

# जोश जितेशचा, विजय आरसीबीचा!

## घरच्या मैदानावर राजस्थानला पाजलं पराभवाचं पाणी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आरसीबीने अखेरीस यंदाच्या मोसमात घरच्या मैदानावर पहिला विजय मिळवला आहे. आरसीबीने अखेरच्या षटकांमध्ये राजस्थान रॉयल्सवर ११ धावांनी शानदार विजय नोंदवला. तर राजस्थान रॉयल्सचा संघ पुन्हा एकदा विजयाच्या उंबरठ्यावर येऊन विजय मिळवण्यात अपयशी ठरला. ध्रुव जुरेल, शिमरॉन हेटमायर आणि शुभम दुबे अखेरच्या षटकांमध्ये संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.**




तर जितेश शर्माची रिव्ह्यूची मागणी टर्निंग पॉईंट ठरली. ध्रुव जुरेल ३२ चेंडूत ४७ धावा करत उत्कृष्ट फलंदाजी करत होता आणि चांगली फटकेबाजी करत होता. हेझलवूड १९वे षटक टाकण्यासाठी आला, हेझलवूडने तिसरा चेंडू यॉर्कर टाकला आणि जितेश ऑफ साईडला मारण्याचा प्रयत्न करत होता, पण बॅट जमिनीवर आदळली आणि चेंडू जितेशच्या हातात गेला. जितेशने अपील केलं. पण चेंडूचा आवाज आल्याचं हेजलवूड म्हणाला. पण जितेशने रिव्ह्यू घेण्याची मागणी केली. जितेशची रिव्ह्यूची मागणी ऐकताच रजत पाटीदार आला आणि त्याने रिव्ह्यूचा इशारा केला. रिव्ह्यूमध्ये चेंडू बॅटला आदळून उडल्याचं दिसून आलं. स्निकोमीटरवर चेंडू बॅटला लागल्याची हालचाल दिसली आणि आरसीबीला मोठी विकेट मिळाली. ध्रुव जुरेल ३४ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकारांसह ४७ धावा करत बाद झाला. यानंतर हेझलवुडने आर्चरला झेलबाद करत १९ व्या षटकात २ विकेट घेत १ धाव दिली.प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूने विराट कोहली आणि देवदत्त पडिकल यांच्या दमदार अर्धशतकांच्या मदतीने २०५ धावा केल्या. यानंतर, यशस्वी जैस्वाल आणि ध्रुव जुरेल यांच्या दमदार खेळींमुळे राजस्थानला विजयाची आशा निर्माण झाली. पण जोश हेझलवूड आणि कृणाल पंड्या यांनी त्यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीने सामना फिरवला आणि बेंगळुरूला संस्मरणीय विजय मिळवून दिला. राजस्थानकडून यशस्वी जैस्वालने डावाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारून स्फोटक सुरुवात केली. जयस्वालने वैभव सूर्यवंशीसोबत मिळून फक्त पाचव्या षटकात संघाला ५० धावांचा टप्पा ओलांडून दिला. त्यानंतर नितीश राणानेही आक्रमक फलंदाजी सुरू केली. राजस्थानने पॉवरप्लेमध्येच ७२ धावा केल्या होत्या आणि त्याच षटकात जोश हेझलवूडने जैस्वालची विकेट घेत बंगळुरूला मोठा दिलासा दिला. पण नितीश आणि कर्णधार रियान पराग यांनीही आक्रमक फलंदाजी केली आणि ९ व्या षटकापर्यंत संघाला ११० धावांपर्यंत पोहोचवले.१० व्या षटकात कृणाल पंड्याने रियान परागची विकेट घेतली आणि त्यानंतर फिरकीपटूंनी चांगली गोलंदाजी केली. कृणालने स्पेलमधील तिसऱ्या षटकात नितीशलाही बाद केलं. यानंतर, जबाबदारी ध्रुव जुरेल आणि शिमरॉन हेटमायरवर आली, जे गेल्या २ सामन्यांमध्ये पराभवाचे खलनायक ठरले होते. त्यानंतर १८ व्या षटकात, जुरेलने भुवनेश्वर कुमारच्या षटकात २२ धावा काढून संघाला सामन्यात कायम ठेवले. पण १९ व्या षटकात पुन्हा सामना फिरला. हेझलवुडने प्रथम जुरेल आणि नंतर जोफ्रा आर्चरला पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले आणि फक्त १ धाव दिली. २० व्या षटकात आवश्यक असलेल्या १७ धावा राजस्थानच्या आवाक्याबाहेर राहिल्या आणि राजस्थानला १९४ धावांवर रोखून संघाला संस्मरणीय विजय मिळवून दिला.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने चिन्नास्वामी स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना ५ विकेट्स गमावत २०५ धावांचा टप्पा ओलांडला.

### संदीप शर्माने 2 विकेट्स घेतले

गेल्या काही सामन्यांमध्ये गडबडलेल्या फलंदाजी फळीने चांगली सुरूवात केली. विराट आणि सॉल्टने पॉवरप्लेमध्ये संघाला ५० धावांचा टप्पा गाठून दिला. फिल सॉल्ट २६ धावा करत बाद झाला. तर विराट कोहलीने ७० धावांची खेळी केली. विराट कोहलीने ४३ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ७० धावा केल्या. तर देवदत्त पडिक्कलने चांगली फलंदाजी करत २७ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५० धावा केल्या. यानंतर टीम डेव्हिड २३ धावा तर जितेश शर्माने २० धावांची खेळी करत संघाला २० धावांचा टप्पा गाठून दिला. राजस्थानकडून संदीप शर्माने २ विकेट्स घेतले. तर आर्चर आणि वानिंदू हसरंगाला १-१ विकेट घेता आली.कृणालने स्पेलमधील तिसऱ्या षटकात नितीशलाही बाद केलं. यानंतर, जबाबदारी ध्रुव जुरेल आणि शिमरॉन हेटमायरवर आली, जे गेल्या २ सामन्यांमध्ये पराभवाचे खलनायक ठरले होते.

---

# बंगळुरूत कोहलीचं 'विराट' वादळ!

## विराटने 33 चेंडूंचा सामना करत आपलं अर्धशतक पूर्ण केलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा स्टार फलंदाज विराट कोहलीचा सुपरहिट शो सुरू आहे. या स्पर्धेत फलंदाजी करताना विराट कोहलीने धावांचा पाऊस पाडला आहे. राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यातही विराटची बॅट चांगलीच तळपली. या डावात फलंदाजी करताना त्याने ७० धावांची खेळी केली.**




या खेळीसह त्याने टी-२० क्रिकेटमधील मोठ्या रेकॉर्डमध्ये बाबर आझमला मागे सोडलं आहे.धावांचा पाठलाग करताना खेळी कशी सजवायची, हे विराट कोहलीला चांगलच माहित आहे. त्यामुळेच विराट कोहलीला चेजमास्टर म्हटलं जातं. मात्र, पहिल्या डावात फलंदाजी करतानाही त्याने अनेक मोठे रेकॉर्ड्स मोडून काढले आहेत. राजस्थान रॉयल्सविरूद्ध झालेल्या सामन्यात विराट कोहली सलामीला फलंदाजीसाठी आला. विराटने ३३ चेंडूंचा सामना करत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. हे विराटने पहिल्या डावात फलंदाजी करताना विराटने झळकावलेले ६२ वे अर्धशतक आहे. या रेकॉर्डमध्ये त्याने बाबर आझमला मागे सोडलं आहे. बाबर आझमच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये पहिल्या डावात फलंदाजी करताना ६१ अर्धशतकं झळकावण्याची नोंद आहे. तर वेस्टइंडिजचा माजी फलंदाज ख्रिस गेल या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. गेलने ५७ अर्धशतकं झळकावली आहेत.

या सामन्यात राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कारण हे मैदान छोटं आहे आणि या मैदानावर धावांचा पाठलाग केला जाऊ शकतो.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या विराट कोहली आणि फिल सॉल्टने गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला.सॉल्ट २६ धावा करत माघारी परतला. तर विराट कोहलीने ७० धावा केल्या. हे विराट कोहलीचे या हंगामातील पाचवे अर्धशतक ठरले आहे. विराटला शतक झळकावण्याची संधी होती. मात्र तो झेलबाद होऊन माघारी परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या देवदत्त पडिक्कलने ५० धावांची खेळी केली. शेवटी टीम डेव्हिडने काही आकर्षक फटके मारले. यासह रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने २० षटकअखेर ५ गडी बाद २०५ धावांचा डोंगर उभारला.

### अनेक मोठे रेकॉर्ड्स मोडून काढले

या खेळीसह त्याने टी-२० क्रिकेटमधील मोठ्या रेकॉर्डमध्ये बाबर आझमला मागे सोडलं आहे.धावांचा पाठलाग करताना खेळी कशी सजवायची, हे विराट कोहलीला चांगलच माहित आहे. त्यामुळेच विराट कोहलीला चेजमास्टर म्हटलं जातं. मात्र, पहिल्या डावात फलंदाजी करतानाही त्याने अनेक मोठे रेकॉर्ड्स मोडून काढले आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। शुक्रवार ।
। दि. 25 एप्रिल 2025।

### दोन्ही राष्ट्रांमध्ये शैक्षणिक, पर्यटन संवाद होणे आवश्यक

# पिंपरी चिंचवड विद्यापीठ आणि कोरिया विद्यापीठामध्ये सामंजस्य करार!

## आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्याच्या संधी उपलब्ध होणार



**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारत आणि कोरिया यांच्यामध्ये शिक्षण, संस्कृती आणि जागतिक स्तरावरील रोजगार, उद्योग, व्यापाराच्या अनेक संधी नव्याने निर्माण होत आहेत. यासाठी या दोन्ही राष्ट्रांमध्ये शैक्षणिक, पर्यटन संवाद होणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाने सुरू केलेले काम भारत कोरिया यांच्यातील दुवा ठरेल. हा करार आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्याच्या संधी शोधण्यासाठी एक यशस्वी माध्यम ठरणार आहे असा विश्वास केटीओ इंडिया क्षेत्रीय संचालक मायॉंग किल युन यांनी व्यक्त केला.**



> सांस्कृतिक अनुभव, शैक्षणिक विनिमय आणि अभ्यास दौऱ्यांच्या दृष्टीने दक्षिण कोरिया हे अत्यंत समृद्ध केंद्र आहे. पीसीईटी, पीसीयूने अलीकडेच कोरियातील सॅमयुंग विद्यापीठ आणि कांगओन नॅशनल युनिव्हर्सिट या नामांकित शैक्षणिक संस्थांबरोबर पिंपरी चिंचवड विद्यापीठाने शिक्षण, रोजगार आणि संशोधनाच्या सहकार्यासाठी सामंजस्य करार केले आहेत.
>
> **–डॉ. गिरीश देसाई,** कार्यकारी संचालक

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे कोरिया टुरिझम ऑर्गनायझेशन (केटीओ) च्या सहकार्याने पुण्यात आयोजित कोरियन एज्यू टूर रोड शो चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना मायॉंग किल युन बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण संचालनालय संचालक महाराष्ट्र शासन डॉ. शैलेश देवळलणकर, पीसीइटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई तसेच राज्यभरातून १२५ हून अधिक शाळा महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित होते.

कोरिया देश हा के-ड्रामा, के-पॉप आणि खाद्यसंस्कृती सह आता नवोन्मेष, शैक्षणिक गुणवत्ता आणि सांस्कृतिक परंपरांचा संगम म्हणून ओळखला जाईल.त्यासाठी कोरियाचे प्रतिनिधी म्हणून भारतातील शैक्षणिक संस्थांना आणि विद्यार्थ्यांना कोरियाशी संबंध निर्माण करण्यात आणि त्यांच्या बहुआयामी संधी शोधण्यात मार्गदर्शन करण्यासाठी करण्यासाठी काम करत आहोत, असे मायॉंग किल युन यांनी सांगितले.

डॉ. शैलेश देवळलणकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले तसेच दक्षिण कोरिया हा भारताचा अत्यंत जवळचा मित्र देश आहे. महाराष्ट्रभर एक दिवस कोरियन शिक्षण प्रणालीला समर्पित करून साजरा करण्याचा विचार व्हावा. स्टडी इन कोरिया या उपक्रमाअंतर्गत अशा शैक्षणिक मेळाव्यांचे आयोजन कोरिया टुरिझम ऑर्गनायझेशनद्वारे (केटीओ) होऊ शकते. लवकरच भारतात एक कोरियन विद्यापीठ स्थापन होण्याची शक्यता आहे. या शैक्षणिक सामंजस्य करारामुळे भारत कोरियाचे संबंध अधिक दृढ व्हावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र शासन विद्यार्थ्यांच्या देवाण-घेवाण कार्यक्रमांसाठी, शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी, उद्योग क्षेत्रातील भेटींसाठी किंवा इंटर्नशिप संधींसाठी आवश्यक त्या सर्व सहकार्याला तयार आहे. महाराष्ट्र हे शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दृष्टीने भारतातील एक सर्वोत्तम राज्य आहे. येथे विविध प्रकारची उद्योगनिर्मिती आणि शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. असेही डॉ. शैलेश देवळलणकर यांनी सांगितले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई उपस्थित होते.


ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch
"यत् भावो – तत् भवति"
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> 'C ++' Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

# 2025-26 ADMISSIONS OPEN

## PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

**86687 55826**

**98232 31705**

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


( Since 2013)
MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com